पुण्य नगरी

# श्री वारणा सहकारी बँक लि., वारणानगर

ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर.

## वार्षिक सर्वसाधारण सभा

### * नोटीस *

(फक्त सभासदांकरीता)

सर्व सभासदांना कळविणेत येते की, आपल्या बँकेची सन २०२३-२४ ची **५९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा, गुरूवार, दि. २९/०८/२०२४ रोजी दु. ३.०० वा. 'विनय कोरे क्रीडा व सांस्कृतिक सभागृह, तात्यासाहेब कोरे इंजिनिअरिंग कॉलेज', वारणानगर येथे** खालील विषयांवर विचार व निर्णय घेणेसाठी बोलविणेत आलेली असून सर्व सभासदांनी वेळेवर अगत्यपूर्वक हजर रहावे, ही विनंती आहे.

### * सभेपुढील विषय *

१) दि. १०/०८/२०२३ रोजी झालेल्या मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे प्रोसिडींग वाचून कायम करणे.

२) सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील बँकेच्या कामकाजाचा अहवाल व बँकेचे वैधानिक लेखापरिक्षकांनी तपासलेला ताळेबंद व नफा-तोटा पत्रके मंजूर करणे.

३) संचालक मंडळाने मंजूर केलेल्या सन २०२३-२०२४ सालाचे नफा विभागणीस अंतिम मंजूरी देणे व लाभांश जाहीर करणे.

४) सन २०२३-२४ मध्ये अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजूरी देणे. तसेच सन २०२४-२५ सालाकरीता खर्चाचे अंदाजपत्रक मंजूर करणे.

५) वैधानिक लेखापरिक्षक मे. केजीबी ॲण्ड जे असोसिएटस्, चार्टर्ड अकौंटंटस्, कोल्हापूर यांचेकडून आलेला सन २०२३-२४ सालचा तपासणी अहवाल अवलोकनी घेणे व तो स्विकारणे तसेच सन २०२२-२३ च्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाच्या दोष दुरुस्ती अहवालास मान्यता देणे.

६) बँकिंग नियमन कायदा १९४९ मधील तरतुदीनुसार रिझर्व्ह बँकेच्या RBI/2021-22/25 Reft.No.DoS.co.arg/sec 01/08.091.001/2021-22 Dt. 27/04/2021 इ. रोजीच्या परिपत्रकान्वये संचालक मंडळाने सन २०२४-२५ सालाकरीता वैधानिक लेखापरीक्षकांचा प्रस्ताव रिझर्व्ह बँकेस सादर केला असून त्यांचेकडून आलेल्या मान्यतेनुसार सन २०२४-२५ सालाकरीता वैधानिक लेखापरीक्षक नियुक्त करणे व त्यांचा मेहनताना ठरविणेबाबत.

७) संचालक मंडळाने कर्जातील व्याज, दंडव्याज तसेच एक रक्कमी कर्ज परतफेड योजनेअंतर्गत व इतर वसुली खर्चात दिलेल्या सवलतीस मान्यता देणे व दीर्घकाळ थकीत असलेली कर्जे बुडीत कर्ज निधी खाती निर्लेखित करणेस मंजुरी देणे.

८) संचालक मंडळाने शिफारस केलेल्या बँकेच्या स्टाफींग पॅटर्नला मान्यता देणे.

९) संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.

१०) वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांचे अनुपस्थितीस मंजुरी देणे.

११) संचालक मंडळाने शिफारस केलेल्या बँकेचा लाँग टर्म पर्सपेक्टीव्ह प्लॅनला मान्यता देणे.

१२) सन २०२३-२४ ते २०२८-२९ या कालावधीसाठी झालेल्या संचालक मंडळाचे निवडणूक निकालाची नोंद घेणे.

१३) रिझर्व्ह बँक निकषानुसार सन २०२४-२५ सालाकरीता तयार केलेले Compromise Settlements & Technical Write-offs धोरणास अंतिम मान्यता देणे.

१४) मा. अध्यक्षसो यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

संचालक मंडळाचे आदेशावरून
**राजेश पद्माकर सार्दळ,**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

**स्थळ : वारणानगर**
**दिनांक : ०९/०८/२०२४.**

### * सभासदांना नम्र सूचना *

१. आवश्यक गणपुर्ती अभावी सभा तहकूब झालेस सदरची सभा त्याच दिवशी अर्ध्या तासानंतर होईल व त्या सभेस गणपुर्तीची आवश्यकता असणार नाही.
२. सभासदांना काही माहिती हवी असलेस अगर काही सूचना करावयाच्या असतील तर त्या दि.२६.०८.२०२४ पर्यंत हेड-ऑफिस, वारणानगर येथे पोहचतील अशा बेताने पाठवाव्यात.
३. सहकार कायद्यास अनुसरून उपस्थित सभासदांना सभेस उपस्थित राहिल्याबद्दलचे 'उपस्थिती प्रमाणपत्र' देण्यात येणार आहे. सदर उपस्थिती प्रमाणपत्र सभा नोटीसीचा भाग असल्याने सभेची नोटीस सोबत असल्याशिवाय सभागृहात प्रवेश दिला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.
४. ज्या सभासदांनी मागील सालातील डिव्हीडंडची रक्कम घेतलेली नाही त्यांनी आपली डिव्हीडंडची रक्कम घेऊन जाण्याची व्यवस्था करावी.
५. पोटनियमानुसार बँकेच्या भागाची दर्शनी किंमत रु. १०००/- असून किमान दोन भाग धारण करणे अनिवार्य आहे. तरी ज्या सभासदांनी भाग धारणा पूर्ण केली नाही त्यांनी कृपया याची पूर्तता करावी.
६. वार्षिक अहवालाची प्रत बँकेच्या सर्व शाखांमधुन दि. ०९.०८.२०२४ पासून उपलब्ध होईल. तसेच बँकेच्या www.waranabank.com या वेबसाईटवर उपलब्ध राहील.